# प्रकरण ७.
# करसंरचना

कर हे महसुली उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन असून शासनाने लोकांकडून विविध पातळ्यांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पद्धतीने सक्तीने वसूल केलेली रक्कम म्हणजे कर होय. कर हा शासनाच्या महसूली उत्पन्नाचा महत्त्वाचा घटक असून केंद्र सरकारच्या एकूण महसुली उत्पन्नातील कर उत्पन्नाचा वाटा जवळपास ८५ टक्के इतका आहे.शासनाला राज्यघटना कलम २६५ अंतर्गत कर रोपण करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.




## ❖ महत्त्वांच्या संकल्पना :-

- **कर आघात** - प्रत्यक्षात प्रथम ज्यास कर भरावा लागतो, त्याच्यावर कर आघात झाला असे म्हणतात.
- **करभार** - करसंक्रमणाच्या अंतिम टप्प्यावर ज्यांच्यावर प्रत्यक्षात कराचे ओझे पडते, त्याच्यावर करभार लादला असे म्हणतात.
- **कर संक्रमण** - कर आकारणीच्या विविध टप्प्यावर कराचे ओझे स्थानांतरित करण्याची किंवा वेगवेगळ्या घटकांवर लावण्याची प्रक्रिया म्हणजे करसंक्रमण होय.
- प्रत्यक्ष कराच्या बाबतीत कर घात व करभार एकाच घटकावर होत असतो. परंतु अप्रत्यक्ष कराच्या बाबतीत हे घटक वेगळे असतात व ते कर संक्रमणाच्या माध्यमातून कराचे वहन घडत असते.

### कराचे प्रकार (Types of Taxes)

| स्वरुपानुसार प्रकार | प्रमाणानुसार प्रकार | कर आकरणीच्या पातळीनुसार प्रकार |
|---|---|---|
| • प्रत्यक्ष कर - ज्यामध्ये कर आघात व करभार एकाच व्यक्तीवर पडतो, असा कर म्हणजे प्रत्यक्ष कर होय.<br>उदा. प्राप्ति कर, भांडवल कर, देणगी कर, व्यवसाय कर इ.<br>• अप्रत्यक्ष कर - ज्यामध्ये कराघात एकावर व करभार दुसऱ्यावर पडतो, असा कर म्हणजे अप्रत्यक्ष कर होय.<br>• उदा. विक्री कर, सेवा कर, जकात कर, करमणूक कर इ. | • प्रमाणशीर कर – या पद्धतीमध्ये उत्पन्नाच्या पातळीतील फरक लक्षात न घेता सर्वांकडून सारख्या प्रमाणात कर आकारला जातो.<br>• प्रगतीशील कर– या पद्धतीत उत्पन्नाच्या पातळीनुसार कराचे प्रमाण किंवा टक्केवारी वाढत जाते. उदा. आयकर<br>• प्रतिगामी कर - उत्पन्न वाढत असतांनाही जर कर दायित्वाचे उत्पन्नाशी असलेले प्रमाण कमी होत असेल तर त्या करास प्रतिगामी कर असे म्हणतात. | • स्थानिक कर – स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आकारला जाणारा कर. उदा. घरपट्टी, पाणीपट्टी, यात्रा कर, जकात कर. इ.<br>• राज्य कर – राज्य सरकारकडून आकारला जाणारा कर उदा. मूल्यावर्धित कर, व्यवसाय कर, मुद्रांक शुल्क, शेती उत्पन्नावरील कर इ.<br>• केंद्रीय कर - केंद्र सरकारकडून आकारला जाणारा कर. उदा. आयकर, उत्पादन शुल्क, कंपनी कर, सेवा कर इ. |

## ❖ करांचे वर्गीकरण :

**प्रत्यक्ष कर**

१) उत्पन्नावरील कर
i) वैयक्तिक आयकर
ii) महामंडळ कर

२) संपत्तीवरील कर
i) मालमत्ता कर
ii) देणगी कर

३) भांडवली व्यवहारांवरील कर
i) भांडवली लाभ कर

**अप्रत्यक्ष कर**

१) अबकारी कर
i) केंद्रीय अबकारी कर ii) राज्य अबकारी कर

२) सीमा कर / जकात कर
i) आयात कर ii) निर्यात कर

३) विक्री कर
i) केंद्रीय विक्री कर ii) राज्य विक्री कर (व्हॅट)

४) सेवा कर

५) करमणूक कर, वाहनांवरील कर, नोंदणी शुल्क इ. राज्यांचे कर

## प्रत्यक्ष कर

- जेव्हा कराघात (Impact of Tax) व करभार (Incidence of Tax) एकाच व्यक्तीवर पडतात. तेव्हा त्याला प्रत्यक्ष कर म्हणतात.
- उदा. प्राप्तिकर, भांडवली कर, वारसाकर इ. या कराचे संक्रमण होत नाही.




## ➢ काही करांविषयी माहिती :-

### १. वैय्यक्तिक आयकर /प्राप्ती कर (Personal Income Tax) :-

- व्यक्तींनी कमावलेल्या उत्पन्नावर लावल्या जाणाऱ्या करास 'वैय्यक्तिक आयकर' असे म्हणतात.भारतात आयकर आकारण्यास सुरुवात १८६० पासून झाली. सध्या आयकरास 'इन्कम टॅक्स ॲक्ट'– १९६१' हा कायदा लागू आहे.
- हा कर करक्षमता तत्वावर आधारलेला आहे. हा कर सर्व व्यक्तींवर बसविला जात नसून व्यक्तींच्या कर भरण्याच्या क्षमतेवर आकारला जातो. अशा रीतीने, आय कर हा एक प्रगतीशील / पुरोगामी स्वरुपाचा कर आहे.
- करमुक्त मर्यादा (exemption limit) : २०१२ – १३ च्या अर्थसंकल्पसानुसार, ही करयुक्त मर्यादा २.०० लाख रुपयांपर्यंत आहे. ही मर्यादा ६० ते ८० वयाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी २.५० लाख एवढी निश्चित करण्यात आली आहे, तर ८० पेक्षा अधिक वयाच्या जेष्ठ नागरिकांसाठी ५ लाख इतकी निश्चित करण्यात आली आहे.
- सहकारी सोसायटयांना १०,००० रुपयांपेक्षा कमी उत्पन्नावर १० टक्के, १०,००० ते २०, ००० रुपयांच्या उत्पन्नावर २० टक्के, तर त्यावरील उत्पन्नावर ३० टक्के आयकर भरावा लागतो. आयकरावर ३ टक्के शिक्षण उपकर (Education Cess) आकारला जातो.
- २०१९ च्या अर्थसंकल्पानुसार दीर्घ मुदतीच्या भांडवल गुंतवणूकीवर १० टक्के आयकर आकारला जाईल.
- २०२० च्या अर्थसंकल्पत आयकरासंदर्भात विवाद से विश्वास तक योजना जाहीर करण्यात आली. तसेच जे अनिवासी भारतीय किंवा परकीय व्यक्ती भारतात १२० दिवसापेक्षा जास्त दिवस राहिल्यास कर भरण्यास पात्र असेल.
- २०२१ च्या अर्थसंकल्पात ७५ वर्षा पुढील नागरिंकाना आयकर विवरण पत्र सादर करणे दंधनकारक नसेल तसेच पेन्शनवर कर आकाराला जाणार नाही.

#### आयकर आणि महत्तम सिमांतिक दर : २०१६-१७

**नागरीक (वय ६० वर्षे पेक्षा कमी) व इतर**

| उत्पन्न | आयकर | अधिभार | शिक्षण उपकर | महत्तम सिमांतिक दर |
|---|---|---|---|---|
| २.५ लाख रु. पर्यंत | ०% | ०% | ०% | ०% |
| २.५ ते ५ लाख रु. | १०% | ०% | ३% | १०.३०% |
| ५ ते १० लाख रु. | २०% | ०% | ३% | २०.६०% |
| १० लाख ते १ कोटी रु. | ३०% | ०% | ३% | ३०.९०% |
| १ कोटी रु. पेक्षा जास्त | ३०% | १५% | ३% | ३५.५३% |

**ज्येष्ठ नागरीक (वय ६० ते ८०)**

| उत्पन्न | आयकर | अधिभार | शिक्षण उपकर | महत्तम सिमांतिक दर |
|---|---|---|---|---|
| ३ लाख रु. पर्यंत | ०% | ०% | ०% | ०% |
| ३ ते ५ लाख रु. | १०% | ०% | ३% | १०.३०% |
| ५ ते १० लाख रु. | २०% | ०% | ३% | २०.६०% |
| १० लाख ते १ कोटी रु. | ३०% | ०% | ३% | ३०.९०% |
| १ कोटी रु. पेक्षा जास्त | ३०% | १५% | ३% | ३५.५३% |

**भारतातील आयकर व्यवस्थेस १५० वर्षे पूर्ण** – भारतातील आयकर व्यवस्थेस २४ जुलै, २०१० रोजी १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. देशातील आयकराचा पहिला कायदा १८६० साली संमत करण्यात आला होता. त्यानुसार २४ जुलै, १८६० पासून भारतात आयकर व्यवस्थेचा कार्यारंभ झाला होता. ब्रिटिश काळात त्याबाबतचे विधेयक वित्त सदस्य जेम्स विल्सन यांनी मांडले होते.

### २. महामंडळ कर / निगम कर (Corporation Tax) :-

- कंपन्यांच्या / उत्पादन संस्थांच्या उत्पन्नावर / नफ्यावर जो कर आकारला जातो. त्याला महामंडळ कर असे म्हणतात. केंद्र सरकार हा कर मोठया तसेच लहान कंपन्यांवर आकारते.
- पूर्वी महामंडळ कराचा दर अधिक असायचा. मात्र १९९० – ९१ पासून तो कमी करण्यात आला. तसेच पूर्वी त्यावर १५ टक्के अधिभार आकारला जायचा तो १९९६ – ९७ मध्ये रद्द करण्यात आला. मात्र, १९९९–२००० च्या अर्थसंकल्पात तो पुन्हा १०% एवढा आकारण्याचे ठरवण्यात आले.
- सध्या (२०१२–१३) भारतीय कंपन्यासाठी महामंडळ कर त्यांच्या निव्वळ नफ्याच्या ३०% तर परकीय कंपन्यासाठी त्यांच्या निव्वळ नफ्याच्या ४०% इतक्या दराने आकारला जातो.

## निगमकर आणि महत्तम सिमांतिक दर : २०१६ - १७

| उत्पन्न | निगम कर | अधिभार | शिक्षण उपकर | महत्तम सिमांतिक दर |
|---|---|---|---|---|
| **देशी मोठया जुन्या संस्था** | | | | |
| निव्वळ नफा | ३०% | ०% | ३% | ३०.९०% |
| १ कोटी रु. पेक्षा जास्त | ३०% | ७५ | ३% | ३३.०६% |
| १० कोटी रु. पेक्षा जास्त | ३०% | १२% | ३% | ३४.६१% |
| **देशी छोटया जुन्या संस्था** | | | | |
| निव्वळ नफा | २९% | ०% | ३% | २९.८७% |
| १ कोटी रु. पेक्षा जास्त | २९% | ७% | ३% | ३१.९६% |
| १० कोटी रु. पेक्षा जास्त | —— | —— | —— | —— |
| **देशी नव्या संस्था : (इतर सवलती घेत नसल्यास)** | | | | |
| निव्वळ नफा | २५% | ०% | ३% | २५.७५% |
| १ कोटी रु. पेक्षा जास्त | २५%१२% | ७% | ३% | २७.५५% |
| १० कोटी रु. पेक्षा जास्त | २५% | १२% | ३% | २८.८४% |
| **परकीय संस्था** | | | | |
| निव्वळ नफा | ४०% | ०% | ३% | ४१.२०% |
| १ कोटी रु. पेक्षा जास्त | ४०% | २% | ३% | ४२.०२% |
| १० कोटी रु. पेक्षा जास्त | ४०% | ५% | ३% | ४३.२६% |

### i. किमान पर्यायी कर (Minimum Alternate Tax MAT) :-

- महामंडळ कराशी संबंधित कर आहे. ज्या कंपन्या आपल्या जमा - खर्चात मोठा नफा दाखवितात. मात्र विविध कर सवलती, कर कपात, कर प्रोत्साहने इत्यादीमुळे कराच्या जाळ्यातून सुटतात. अशा कंपन्यांवर MAT आकारला जातो.
- MAT हा कर १९९६ – ९७ च्या अर्थसंकल्पापासून आकारण्यात येतो. २०१६ – १७ च्या अर्थसंकल्पात या कराचा दर १८.५ टक्के इतका करण्यात आला आहे.

| उत्पन्न | उदा. | MAT कर | निगम कर | अधिभार | शिक्षण उपकर | महत्तम सिमांतिक कर | एकूण कर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुस्तकी नफा | १० लाख | ..... | ३% | ३०.९०% | | | ० |
| निव्वळ नफा | १० लाख | | ३०% | ०% | ३% | ३०.९०% | ३.०९ लाख |
| | | | | | | एकूण | ३.०९ लाख |

**वजावट किंवा सवलत घेतली तर**

| उत्पन्न | उदा. | MAT कर | निगम कर | अधिभार | शिक्षण उपकर | महत्तम सिमांतिक कर | एकूण कर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुस्तकी नफा | १० लाख | १८.५% | | | | | १.८५ लाख |
| निव्वळ नफा | ५ लाख | | ३०% | ०% | ३% | ३०.९०% | १.५४५ लाख |
| | | | | | | एकूण | ३.३९५ लाख |

### ii. लाभांश वितरण कर :- 
भारतीय कंपन्यांनी एका वर्षात आपल्या भागधारकांना वितरित केलेल्या लाभांशाच्या मूल्यावर हा कर आकारला जातो. भारतातील परकीय कंपन्यांना हा कर लागू होत नाही. या कराचा दर सध्या १५ टक्के आहे.

## ३. खर्च कर (Expenditure Tax) :-

- प्रो. निकोलस कॉल्डॉर (ब्रिटिश अर्थतज्ज्ञ) यांच्या शिफारसीनुसार (१९५६) तत्कालीन वित्त मंत्री टि. टि. कृष्णामाचारी यांनी हा कर १९५७ पासून लागू केला होता, मात्र तो १९६६ मध्ये रद्द करण्यात आला होता.
- नोव्हेंबर १९८७ पासून पुन्हा खर्च कर आकारण्यात येऊ लागला. यानुसार पंचतारांकित हॉटेलमध्ये निवास, अन्न, पेये इत्यादीवर प्रती दिन दरडोई खर्च ४०० रुपयांपेक्षा अधिक असल्यास हा खर्च लावला जाई. मात्र नंतर पुन्हा खर्च कर टप्प्याटप्प्यांनी पुन्हा रद्द करण्यात आला.

## ४. मालमत्ता कर / वारसाहक्क कर (Estate Duty) :-




- १९५३ पासून आकारण्यास सुरुवात झाली आहे.
- वारसा हक्काने मिळणाऱ्या मालमत्तेवर (अनर्जित उत्पन्न) हा कर आकरण्यात येत असे.
- मात्र कमी महसूली उत्पन्न, कर टाळण्याचे मार्ग शोधून काढण्याची प्रवृती कर वसुलीचा अधिक खर्च इ. कारणांमुळे मार्च १९८५ मध्ये तत्कालीन अर्थमंत्री व्हि. पी. सिंग यांनी तो रद्द केला.

## ५. देणगी कर (Gift Tax) :-




- निकोलस कॉल्डॉर यांच्या शिफारसीनुसार हा कर एप्रिल १९५८ पासून आकारण्यास सुरुवात झाली.
- मागील आर्थिक वर्षात दिलेल्या देणग्यांवर हा कर पुढील आर्थिक वर्षात आकारला जाई. सुरुवातीला देणगी देणाऱ्याकडून आकारला जाई. मात्र १९९० – ९१ च्या अर्थसंकल्पापासून तो देणगी स्विकारणाऱ्यावर आकारण्यास सुरुवात झाली.
- मात्र त्यातून मिळणारा कर महसूल अत्यंत कमी असल्याने १९९८ – ९९ च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी तो रद्द केला. आता स्विकारलेली देणगी त्याच्या उत्पन्नाचा हिस्सा मानण्यात येतो.

## ६.संपत्ती कर (Wealth Tax) :-




- मे १९५७ पासून प्रो. निकोलस कॉल्डॉर यांच्या शिफारसीनुसार आकारण्यास सुरुवात झाली.
- व्यक्ती, हिंदू अविभाजीत कुंटुंबे इत्यादींच्या संचित संपत्तीवर हा कर आकारला जातो व तो चालू भरायचा असतो.
- १९९२ – ९३ च्या अर्थसंकल्पापासून अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी उत्पादनक्षम मालमत्तेवरील (उदा. शेअर्स) संपत्ती कर रद्द केला. व तो फक्त अनुत्पादक मालमत्तावर (उदा. गेस्ट हाऊसेस, राहती घरे, दागिने इ.) आकारण्याचे निश्चित केले.
- एप्रिल १९९३ पासून तो १५ लाख रुपयांपेक्षा अधिक मालमत्तेवर एक टक्का या दराने आकारण्यात येतो.

# अप्रत्यक्ष कर

- ज्या करपद्धतीमध्ये कराघात एका व्यक्तीवर व करभार अंतिम व्यक्तीवर पडतो. त्याला अप्रत्यक्ष कर असे म्हणतात. अप्रत्यक्ष करांचे संक्रमण होत असते.
- उदा: विक्रीकर, करमणुक कर, पथकर, आयात निर्यात कर इ.



## ७. अबकारी कर / उत्पादन शुल्क- (Excise Tax) :-

- देशांतर्गत उत्पादन झालेल्या वस्तूंवर अबकारी कर आकारण्यात येतो.
- त्याचे दोन प्रकार आहेत. i) केंद्रीय अबकारी कर आणि
  ii) राज्य अबकारी कर.
- राज्य अबकारी कर हा राज्यांचा कर असून तो मादक द्रव्ये, ड्रग्ज, सौंदर्य प्रसाधने इत्यादींच्या उत्पादनावर आकारण्यात येतो. त्यांव्यतिरिक्त इतर वस्तूंच्या उत्पादनावर केंद्रीय अबकारी कर लागू होतो. सध्या तो CENVAT म्हणून आकारला जातो.

## ८. सीमा कर / कस्टम डयुटी (Customs Duty) :-




- मालाच्या आयात-निर्यातीवर आकारला जाणारा कर म्हणजे सीमाशुल्क. सीमाशुल्क हा केंद्रसूचीतील विषय क्रमांक ८३ असून यासाठी सीमाशुल्क कायदा १९६२ (Customs Act १९६२) सध्या लागू आहे.
- निर्यात वस्तूंवर निर्यात कर (Export Duty) तर आयात वस्तूंवर आयात कर (Import Duty) आकारतात. आयात कराचा उद्देश 'उत्पन्न देण्यापेक्षा' देशी 'उद्योगांना संरक्षण देणे' हा असतो. जागतिकीकरणानंतर मात्र आयातशुल्काचे हे कार्य मागे पडत जातेय. निर्यातवृध्दीसाठी निर्यात शुल्क सतत कमी आकारले जाते. आयातकर आणि निर्यातकर यांपासून मिळणाऱ्या महसुलाचा विचार केल्यास एकूण सीमा शुल्कापैकी ९६% ते ९७% वाटा आयातकराचा असतो.
- सीमाशुल्काचा दर – सीमाशुल्कदरासाठी स्वतंत्र सीमा दर कायदा १९७५ अस्तित्वात आहे. सीमाशुल्क आकारताना त्यात खालील करांचा समावेश होतो.

१. **मूळ सीमाशुल्क (Basic Customs Duty -BCD)** – वस्तूंच्या आयात अथवा निर्यातीवर आकारला जाणारा हा मूळ कर असतो. हा कर अनित्य (variable) म्हणजे विविध वस्तूंवर वेगवेगळ्या दराने आकारला जातो. मात्र त्यावर एक उच्चतम मर्यादा असते. गैरकृषी वस्तूंवरील (अपवाद वगळता) मूळ सीमाशुल्काचा उच्चतम दर सध्या १०% आहे.

२. **प्रतिशुल्क (Counter Vailling Duty - CVD)** – भारतातील उत्पादित वस्तूंवर उत्पादनशुल्क आकारले जात असते. परदेशी वस्तू आयात केल्यामुळे त्यांचे मूल्य (उत्पादन शुल्क न आकारल्यामुळे) देशी वस्तूंपेक्षा कमी भरु शकते. यासाठी परदेशी वस्तूंचे मूल्य आणि मुळ सीमाशुल्क या एकत्रित किंमतीवर उत्पादनशुल्काच्या दराने CVD आकारले जाते. कृषी वस्तू, कच्चे पेट्रोलियम ज्यांच्यावर देशात उत्पादनशुल्क आकारत नाहीत, त्यांच्यावर CVD देखील आकारत नाहीत.

३. **शिक्षण उपकर (Education Cess)** – वरील BCD + CVD अशा एकत्रित करमूल्यावर ३% शिक्षण उपकर आकारला जातो.

४. **विशिष्ट अतिरिक्त शुल्क (Special Additional Duty of Customs - SAD)** – वरीलप्रमाणे उत्पादनशुल्कासारखे इतरही कर असतात, जे देशी उत्पादित वस्तूंवर लागू होतात. जसे विक्रीकर, स्थानिक कर, वाहतूक कर इत्यादी. यासाठी वस्तूंच्या आयातीवर सरासरी ४% दराने SAD आकारले जाते. कृषी वस्तू, कच्चे पेट्रोलियम यातून वगळले आहेत. मोटर स्पिरीटवर २००२ पासून SAD आकारले जाते. मोटार स्पिरीटवरील या SAD ला अधिभार असेही म्हणतात.

५. **अतिरिक्त शुल्क (Additional Duty of Customs - AD)** – १९९८ पासून मोटार स्पिरीटच्या आयातीवर आणि १९९९ पासून हायस्पीड डिझेलच्या आयातीवर AD आकारले जाते. सध्या दोन्ही वस्तूंच्या आयातीवर ६ रु. प्रतिलिटर AD आकारले जाते. सध्या दोन्ही वस्तूंच्या आयातीवर ६ रु. प्रतिलिटर AD आकारले जाते. या AD ला रस्ता उपकर (Road Cess) असे म्हटले जाते.

६. **राष्ट्रीय आपत्ती आकस्मिक शुल्क (National Calamity Contingent Duty of Custom - NCCD)** – २००३ पासून विविधोपयोगी वाहने, पॉलिस्टर धागे, दुचाकी वाहने, टेलिफोन यांच्या आयातीवर NCCD आकारले जाऊ लागेल. पुढे मोटार कार, कच्चे पेट्रोलियम यांची यादीत भर पडली. २००८ पासून यादीतून पॉलिस्टर धागे वगळण्यात आले, तर मोबाईल फोनची भर पडली. तक्त्यातील उदाहरणांमध्ये टेलिफोन सेट, मोटार यांच्या आयातीवर १% दराने तर कच्च्या पेट्रोलियमच्या आयातीवर ५० रु. प्रतिटन दराने NCCD आकारले जाते.

- **२०१५-१६ च्या अर्थसंकल्पात काही वस्तूंवरील सीमाशुल्कात बदल केले आहेत जसे -**

I. धातू उद्योगासाठीच्या कोळशावरील मूळ आयातशुल्क २.५% वरुन ५% करण्यात आले आहे.
II. लोह व पोलाद तसेच त्यापासून बनणाऱ्या वस्तूंवरील आयातशुल्क १०% वरुन १५% करण्यात आले आहे.
III. व्यावसायिक वाहनांवरील आयातशुल्क १०% वरुन ४०% करण्यात आले आहे.
IV. डिजिटल व्हिडिओ कॅमेरावरील मूळ आयातशुल्क ०% करण्यात आले आहे.
V. कृत्रिम हृदयाच्या आयातीवरील ५% मूळ आयातशुल्क व प्रतिशुल्क माफ करण्यात आले आहे.
VI. विशिष्ट आदाने, कच्चामाल, आंतरसंक्रामक वस्तू अशा २२ घटकांवरील आयातशुल्कात कपात करण्यात आली आहे.
VII. विजेवर चालणारी वाहने व संकरीत वाहने यावरील सीमाशुल्कातील सवलत या आर्थिक वर्षापर्यंत चालू ठेवण्यात येणार.

- **२०१६-१७ च्या अर्थसंकल्पात घोषित ठळक बाबी –**

I. रेफ्रिजरेटेड कंटेनरवरील मूळ आयातशुल्क दर ५% केला जाणार.
II. माहिती-तंत्रज्ञानसंबंधित हार्डवेअर, भांडवली वस्तू, संरक्षण उत्पादन, कापड उद्योग, पेट्रोलियम, रसायने, कागद, विमानांची व जहाजांची दुरुस्ती या क्षेत्रांमध्ये स्पर्धात्मकतेस प्रोत्साहन मिळावे व आदाने स्वस्त व्हावीत, या उद्देशाने या उद्योगांसाठी लागणाऱ्या आदानांवरील (inputs) सीमाकर आणि उत्पादनशुल्कात कपात केली जाणार.
III. पुढील वर्षापासून (२०१७-१८) प्रमुख बंदरे व विमानतळांच्या ठिकाणी सीमाकर वसूल करण्यासाठी एकल खिडकी म्हणून Custom Single Window Project सुरु करण्यात येणार.

## ९. विक्री कर (Sales Tax) :-




- वस्तूंच्या विक्रीवर विक्री कर लावला जातो. त्याचेही दोन प्रकार आहेत.

१. केंद्रीय विक्री कर (CST) – विक्री एका राज्यातून दुसऱ्या राज्यात झाल्यास हा कर लागू होतो. तो केंद्रामार्फत आकारला जातो, मात्र त्याचे उत्पन्न ज्या राज्यातून विक्री होते. त्या राज्यास मिळते. सध्या या कराचा दर २ टक्के आहे.

२. राज्याचा विक्री कर (सामान्य विक्री कर ) – विक्री जर राज्यातच झाली असेल तर हा कर लागू होतो. सद्या विक्री कराच्या जागी मूल्यवर्धित कर प्रणाली (VAT) लागू करण्यात आली आहे. (त्याची माहिती पुढे देण्यात आली आहे.)

## १०. सेवा कर (Service Tax) :-




- राष्ट्रीय उत्पन्नात ५० टक्क्याहून अधिक हिस्सा असलेल्या सेवा क्षेत्राला कर जाळ्यात आणण्यासाठी १९९४ – ९५ पासून सेवा कर आकारण्यात येतो.

- मात्र सेवा कराला सध्याचा घटनात्मक दर्जा ८८ वा घटना दुरुस्ती कायदा, २००३ ने प्राप्त झाला. त्यानुसार घटनेत कलम २६८ A हे कलम टाकण्यात आले. या कलमानुसार सेवा कराची आकारणी केंद्र सरकारमार्फत केली जाते. तर त्याची वसुली भारत सरकार व राज्य सरकारांमार्फत होते, तसेच त्याच्या महसुली उत्पन्नाची वाटणी केंद्र व राज्य सरकारांमध्ये होते.(Service Tax is levied by Union and collected and appropriated by the Union and the States)

- याच घटनादुरुस्तीने सेवा कर हा विषय ७ व्या अनुसूचीतील केंद्र सुचीत ९२ C क्रमांकाचा विषय म्हणून टाकण्यात आला. सेवा कर जम्मू व काश्मिर वगळता संपूर्ण देशात लागू करण्यात आला. आहे. १९९४–९५ मध्ये सेवा कर ५% होता. त्यामध्ये वेळोवेळी वाढ करण्यात आली. सध्या सेवा कराचा दर १२ टक्के इतका आहे. (३% शिंक्षण उपकरासहित १२.३६%)

- १ जुलै २०१२ पासून मात्र सेवाकर यादीत 'नकारात्मक यादी दृष्टिकोन' (Negative List Approach) ठेवण्यात आला. म्हणजे सेवाकर कायद्यान्वये ६६D कलमान्वये 'कोणत्या सेवांवर सेवाकर आकारला जाणार नाही' हे स्पष्ट केले जाऊ लागले. यासाठी पहिली सूचना २० जून २०१२ ला जाहीर करण्यात आली. वेळोवेळी अशा सूचना देऊन नकारात्मक यादीत बदल केले जातात. ३१ मार्च २०१५ पर्यंत या 'नकारात्मक यादीत' (Negative List) १७ सेवागटांचा समावेश होता. CBEC ने २५/२०१२ या क्रमांकाची सूचना २० जून २०१२ ला जाहीर केली. या सूचनेत विविध ३९ प्रकारच्या सेवांचा उल्लेख करुन या सेवांवर सवलत म्हणून शून्य सेवाकर आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. ३१ मार्च २०१५ पर्यंत या 'सवलत यादीत' (Excempt List) ३८ सेवागटांचा उल्लेख होता. म्हणजे १७ + ३८ प्रकारच्या सेवागटांवर सेवाकरमुक्तता होती.

## ११. मूल्यवर्धित कर (VAT) :-




- १९९१ मध्ये राजा चेलय्या समितीने पहिल्यांदा व्हॅटची शिफारस केली होती. जून २००४ मध्ये असिमदास गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली विशेष अधिकार समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार १ एप्रिल २००५ पासून मूल्यवर्धित कराच्या अंमलबजावणीचा निर्णय घेण्यात आला.

- २००५ पूर्वी हरियाणा व गोवा या राज्यांनी ही पुरोगामी करप्रणाली स्विकारली होती. सुरवातीला २१ राज्यांनी व्हॅट प्रणाली स्विकारली.

- १ एप्रिल २००६ पासून छत्तीसगड, झारखंड, मध्यप्रदेश, राजस्थान व गुजरात या राज्यांनी व्हॅट स्विकारला. त्यानंतर १ जानेवारी २००७ पासून तामिळनाडू व पुदूच्चेरी (पाँडिचेरी) तर १ जानेवारी २००८ पासून उत्तरप्रदेश या राज्यांनी मूल्यवर्धित करप्रणाली स्विकारली. अंदमान – निकोबार व लक्षद्वीप हे केंद्रशासित प्रदेश तेथे सुरुवातीपासूनच विक्रीकर नसल्याने व्हॅटपासून मुक्त आहेत.

# केंद्र – राज्य करविभागणी (Tax Distribution)

- घटनेच्या सातव्या परिशिष्टामध्ये तिन्ही सूचींमध्ये असलेल्या करांची आकारणी, वसुली व खर्च करण्याच्या अधिकारांची विभागणी खालील पाच गटात केली आहे.

१. केंद्र सरकारद्वारे आकारणी, वसुली, उत्पन्न व वापर - व्याज कर, खर्च कर, केंद्र सरकारकडून विविध करावर लावलेल्या अधिभाराचे उत्पन्न, आयात – निर्यात जकाती.
२. केंद्र सरकाराद्वारे आकारणी व वसुली, पण उत्पन्न केंद्र व राज्यांना - उत्पन्न कर, उत्पादन कर, सेवाकर
३. केंद्र सरकाराद्वारे आकारणी व वसुली, पण उत्पन्न राज्यांना – संपत्तीकर, देणगी कर, वृत्तपत्राच्या विक्री व जाहिरातीवरील कर, Stock Exchange दरावरील कर इ.
४. केंद्र सरकारद्वारे आकारणी, पण वसुली व उत्पन्न राज्यांना – मुद्रांक शुल्क, औषधे व सौंदर्य प्रसाधने यांच्या उत्पन्नावरील कर इ.
५. राज्य सरकाराद्वारे आकारणी, वसुली, उत्पन्न व वापर – विक्रीकर

## ❖ केंद्र व राज्यांमध्ये कर उत्पन्नाची विभागणी :-

- करांची आकारणी वसुली व उत्पन्न ठेवण्याबाबत घटनेने केंद्र व राज्यांना वेगवेगळे अधिकार देण्यात आले आहेत.

### अ) संघ सूचीतील कर :-

- संघ सूचीमध्ये विषय क्रमांक ८२ ते ९२ (C) पर्यंत १४ करविषयक विनियोजन यांबद्दलच्या तरतुदी कलम २६८, २६८A, २६९, २७० व २७१ मध्ये देण्यात आल्या आहेत.
- त्यानुसार करांची आकारणी, वसुली व उत्पन्नाबाबत केंद्र व राज्यांचे अधिकार पुढीलप्रमाणे :-

१. कलम २६८ मध्ये अशा करांची तरतूद आहे जे कर केंद्र सरकारकडून आकारले जातात, पण ज्यांची वसूली राज्य सरकारने करावयाची असते व ज्यांचे उत्पन्नही राज्य सरकारलाच मिळते. यामध्ये पुढील करांचा समावेश आहे.

i) संघसूचीत उल्लेखलेली मुद्रांक शुल्के
ii) औषधीय व प्रसाधन पदार्थांवरील उत्पादन शुल्के (राज्य अबकारी कर)

२) कलम २६८A मध्ये सेवा कराची तरतूद आहे. सेवा कराची आकारणी केंद्राकडून व वसूली केंद्र व राज्यांकडून केली जाते. तसेच उत्पन्नाची विभागणी केंद्र व राज्यांमध्ये केली जाते.

३) कलम २६९ मध्ये अशा करांची तरतूद आहे जे कर केंद्राकडून आकारले व वसूल केले जातात, मात्र ज्यांचे उत्पन्न राज्यांना मिळते. त्यामध्ये पुढील करांचा समावेश होतो.

i) आंतर-राज्यीय व्यापारादरम्यान होणाऱ्या वस्तूंच्या (वर्तमानपत्रे वगळता) खरेदी किंवा विक्रीवरील कर.
ii) आंतर-राज्यीय व्यापारादरम्यान होणाऱ्या वस्तूंच्या (वर्तमानपत्रे वगळता) पाठवणीवरील (Consignment) कर.

४) कलम २७० मध्ये अशा करांची तरतूद आहे जे कर केंद्र सरकारकडून आकारले व वसूल केले जातात, पण ज्यांची वाटणी केंद्र व राज्यांमध्ये केली जाते..

५) कलम २७१ मध्ये केंद्राच्या प्रयोजनार्थ काही करांवरील अधिभाराची (सरचार्ज) तरतूद करण्यात आली आहे.

### ब) राज्य सूचीतील कर :-

- राज्य सूचीत विषय क्रमांक ४५ ते ६३ दरम्यान सुमारे १९ करविषयक विषयांचा समावेश आहे. हे कर राज्यसरकारकडून आकारले जातात, त्यांची वसूली राज्यसरकारकडून व त्यांचे उत्पन्न राज्य सरकारलाच मिळते. त्यापैकी महत्वाचे कर पुढीलप्रमाणे :-
  १. जमीन महसूल/भूमी कर
  २. कृषी जमिनीवरील मालमत्ता कर
  ३. कृषी उत्पन्नावरील आय कर (मात्र हा सध्या आकारला जात नाही)
  ४. विक्री कर (वर्तमानपत्र विक्री व्यतिरिक्त)
  ५. जकात
  ६. व्यवसाय कर
  ७. वाहने, वीज, करमणूक इ. वरील कर
  ८. जाहिरातींवरील (वर्तमानपत्रातील जाहिरातींव्यतिरिक्त) कर


### क) समवर्ती सूचीतील कर :-

- समवर्ती सूचीमध्ये ३ करविषयक विषय आहेत. त्यांवर कर आकारणीचे अधिकार केंद्र तसेच राज्यांनाही आहे. या करांमध्ये पुढील विषयांचा समावेश आहे.
  १. यंत्रचालित वाहने
  २. मुद्रांक शुल्क (न्यायिक मुद्रांक वगळता)
  ३. समवर्ती सूचीतील कोणत्याही बाबीबाबत शुल्क (न्यायालयात घेतली जाणारी फी वगळता)

### ड) कर आकारणीचा शेषाधिकार :-

- कर आकारणीचा शेषाधिकार केंद्राला/संसदेला देण्यात आला आहे. आतापर्यंत या शेषाधिकाराचा वापर करुन केंद्राने देणगी कर, संपत्ती कर आणि खर्च कर आकारले आहेत.

## ➢ लाफेर विश्लेषण (Lafer Curve)




- कराचा दर व कर उत्पन्न यातील संबंध लाफेर विश्लेषणाच्या आधारे स्पष्ट करता येतो. एका विशिष्ट पातळीपर्यंत कराचा दर वाढवत नेल्यास कर उत्पन्नाच्या पातळीत वाढ होत जाते. परंतु त्यापुढे कराचे दर वाढविल्यास मात्र कर उत्पन्नाच्या पातळीत घट होत जाते.

## केंद्र आणि राज्य सरकारचे कर







| प्रकार | केंद्र सरकार | राज्य सरकार |
|---|---|---|
| प्रत्यक्ष कर | १. आयकर<br>२. कंपनी कर<br>३. संपत्तीकर<br>४. देणगी कर<br>५. व्याज कर | १. हॉटेलवरील कर<br>२. जमीन महसूल<br>३. कृषी उत्पन्न<br>४. व्यवसाय कर<br>५. अनिवासी कर<br>६. व्यय (खर्च) कर |
| अप्रत्यक्ष कर | १. सीमा शुल्क<br>२. केंद्रीय उत्पाद शुल्क<br>३. केंद्रीय विक्रीकर<br>४. सेवा कर | १. विक्रीकर / व्यापारी कर<br>२. स्टँप डयुटी / मुद्रांक शुल्क<br>३. राज्य उत्पादन शुल्क<br>४. वाहन कर<br>५. वस्तू प्रवाशी वाहतूककर<br>६. ऊस खरेदीवरील कर<br>७. जाहिरात कर |

## ➢ करविषयक विविध समित्या :-

### ❖ डॉ. जॉन मथाई समिती : १९५२ :-

- विषय – प्रत्यक्ष कर धोरणाचा आढावा घेणे.
- शिफारस - जमीन महसूल व आयकरात वाढ करावी शेती उत्पन्नावर राज्यांनी कर बसवावा.

### ❖ प्रा. निकोलस कॉल्डॉर समिती : १९५६ :-

- विषय – नवीन कर सुचविणे
- शिफारस – संपत्ती कर (१९५७), देणगीकर (१९५८) लागू

### ❖ महावीर त्यागी समिती १९५८ :-

- विषय - कर चुकवेगिरीची कारणे शोधणे.
- शिफारस - कायद्यातील चुकांचा आधार घेवून खोटे हिशोब तयार करुन कर चुकविणे, जाचक करविषयक कायद्यांमुळे कर चुकविण्याची अपप्रवृत्ती.

### ❖ न्या. के. एन. वांच्छू समिती १९७० :-

- विषय - काळा पैसा निर्माण होण्याची कारण शोधणे.
- शिफारस - कर प्रशासनाकरिता आणि कर दायित्वाकरिता खाते लिहिण्यासोबत कर अंकेक्षण किमान मोठया संस्थाकरिता तरी अनिवार्य केले पाहिजे. ज्यांची विक्री ५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे किंवा ज्याचा कर आकारण्यापूर्वीचा नफा ५० हजार पेक्षा जास्त आहे. अशा संस्थाकरिता कर अंकेक्षण अनिवार्य करण्यात यावे.

### ❖ राज समिती १९७२ :-

- विषय - कृषीविषयक करांचा अभ्यास करणे

### ❖ डॉ. एल.के.झा. समिती : १९७६ :-

- विषय - अप्रत्यक्ष करविषयक धोरणांचा आढावा घेणे.
- शिफारस - उत्पादन कराअंतर्गत 'MODVAT' कर लावावा. १९८६ –'MODVAT' सुरु करण्यात आला.
- या समितीने मूल्यवृध्दी कराची शिफारस केली होती कारण या पद्धतीत कराची उत्पन्न लवचिकता जास्त असते.

### ❖ डॉ. राजा चेलय्या समिती १९९१ :-

- विषय – प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर सुधारणा
- शिफारशी
  १. सेवाकर आकारण्यात यावा.
  २. विक्रीकराऐवजी मूल्यवर्धित कर लागू करावा, व्याजकर रद्द करावा.
  ३. तसेच ह्या समितीने लाफेर विश्लेषणाचा (Lafer Curve) आधार घेवून प्राप्तिकर व कंपनी कराच्या दरात कपात करण्याची शिफारस केली.

### ❖ डॉ. विजय केळकर समिती : २००० :-

- विषय – प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर सुधारणा
- शिफारशी
  १. आयकर आकारण्याची उत्पन्न मर्यादा वाढवावी.
  २. आयकर आकारणीचे दोन टप्पे ठेवावेत.
  ३. १ - ४ लाख रुपये वार्षिक उत्पन्न – २० टक्के
  ४. ४ लाखांपेक्षा अधिक उत्पन्न – ३० टक्के
  ५. कंपनी कराचे दर ३६.५ टक्के वरुन ३० टक्के

## ➢ दुहेरी कर टाळण्याविषयी करार (DTAA-Double Taxation Avoidance Treaty) :-

- परकीय व्यापारासंदर्भात कोणत्याही घटकावर दोन पद्धतीने कर आकारला जाऊ शकतो. ज्या देशातून त्या घटकाची निर्यात होत आहे, त्या देशामध्ये किंवा ज्या देशात त्याची आयत होत आहे. त्या देशामध्ये त्यावर कर आकारला जातो. परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवर याबाबत निश्चित धोरण नसल्याने काहीवेळा एकच घटकावर दोन्ही ठिकाणी कर आकारला जात असे. त्यावर उपाययोजना म्हणून बऱ्याच राष्ट्रांनी इतर राष्ट्रांशी DTAA करार केले आहेत. भारतानेसुद्धा डिसेंबर २००९ पर्यंत एकूण ८४ राष्ट्रांबरोबर अशा पद्धतीचा करार केला आहे.
- या करारानुसार दोन देश आयात निर्यातीच्या संबंधातील कर संरचनेबाबत एकमेकांशी करार करुन केवळ एकाच ठिकाणी कर आकारणी करतात. किंवा दोन्ही ठिकाणी कर आकारणी करावयाची असल्यास पहिल्या ठिकाणी भरला गेलेल्या कराची वजावट दुसऱ्या ठिकाणी दिली जाते.

## ➢ कर चुकवेगिरी प्रतिबंधक सामान्य नियम (GAAR – General Anti Avoidance Rules) :-

- ऑगस्ट २००९ मध्ये DTC चा जो अंतिम मसुदा जाहीर झाला. त्याचा GAAR हा एक भाग होता. प्रत्यक्ष कर पद्धतीतील काही तरतूदींचा आधार घेऊन कर चुकवेगिरीचा (Tax Avoidance) जो प्रयत्न केला. जातो, त्याला आळा घालण्याकरिता GAAR च्या तरतूदी त्यात अंतर्भूत करण्यात आल्या होत्या. यांच्या अंमलबजावणीचे पूर्ण अधिकार आयकर आयुक्त (Income Tax Commissioner) यांना देण्यात आले होते. आतापर्यंत ऑस्ट्रेलिया (१९८१), कॅनडा ( १९८८), द. आफ्रिका (२००६), व चीन

- (२००५) या देशांनी GAAR चा स्वीकार केला आहे. प्रत्यक्ष कर संहितेबरोबरच याची अंमलबजावणी होणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्ष कर संहितेची (DTC) अंमलबजावणी लांबविल्याने केवळ GAAR ची अंमलबजावणी सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला परंतु त्याला सर्व पातळ्यांवरुन विरोध झाल्याने तो निर्णय स्थगित करुन त्याबाबत सल्ला देण्याकरीता पार्थसारथी – शोम समिती स्थापन करण्यात आली.


## ❖ शोम समिती (Partho-Shome Committee) :-

- GAAR ची तरतूदी कधी व कशाप्रकारे लागू करता येतील याबाबत सल्ला देण्यासाठी शोम समितीची स्थापना करण्यात आली होती. सप्टेंबर २०१२ मध्ये या समितीने आपला अहवाल सादर केला.

### महत्वाच्या शिफारशी

- GAAR ची अंमलबजावणी तीन वर्षांसाठी (एप्रिल २०१६ पर्यंत) लांबवावी.
- शेअरबाजारातील नोंदीत शेअर्सच्या हस्तांतरणावरील CGT (Capital Cain Tax) रद्द करावा.
- शेअर्सच्या व्यवहारातील STT (Security Transaction Tax) योग्य प्रमाणात वाढवावा.
- GAAR लागू करण्याची किमान कर सवलतीची मर्यादा ३ कोटी रु. निश्चित करावी.
- मॉरिशसमधील गुंतवणूकदारांचा रहिवासाचा दर्जा ठरविण्यासाठी याचा वापर करु नये.
- केवळ चुकीच्या पद्धतीने कर टाळण्याचा प्रयत्न होत असल्यास GAAR चा वापर करावा.
- GAAR ची अंमलबजावणीकरिता IT Act मध्ये आवश्यक ते बदल करावेत.
- GAAR च्या अंमलबजावणीपूर्वी सप्टेंबर २०१५ पर्यंत संबंधीत घटकांची याबाबत मते जाणून घ्यावीत.

## ➢ व्हॅटची आकारणी :-




- सोने व चांदीवर फक्त १ टक्का कर लागेल.
- औषधे, कृषी उत्पादने, औद्योगिक उत्पादने व भांडवली माल अशा एकूण २७० वस्तूंसाठी ४ टक्के कर लावला जाईल.
- २५० वस्तुंसाठी व्हॅटची आकारणी १२.५ टक्क्यांनी होईल.
- सीएनजी, मद्य, कापड, अन्नधान्य, पेट्रोल, डिझेल, साखर, दक्षिणेकडील राज्यातील चहा, तसेच सामाजिक व स्थानिक संदर्भ असलेल्या ४६ वस्तूंना व्हॅटमधून वगळण्यात आले.
- ५ लाख रु. पेक्षा कमी उलाढाल असणाऱ्या व्यापाऱ्यांना वॅटच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले आहे.

## ➢ MANVAT/MODVAT/CENVAT:-

- MANVAT, MODVAT व CENVAT हे तिन्ही प्रकार केंद्रीय अबकारी प्रणालीस लागू करण्यात आलेली VAT प्रणाली आहे.
- १९७६ च्या एल. के. झा समितीने उद्योग क्षेत्रापैकी वस्तूनिर्माण क्षेत्राला (Manfacturing Sector) VAT लागू करण्याची शिफारस केली. त्यानुसार MANVAT (Manufacturing Value Added Tax) लागू करण्यात आला.
- MANVAT पध्दतीचे चांगले परिणाम दिसून आल्याने १९८६-८७ च्या अर्थसंकल्पात त्यात सुधारणा घडवून आणून त्याचे रुपांतर MODVAT (Modified Value Added Tax) मध्ये करण्यात आले. MODVAT अंतर्गत फक्त अंतिम वस्तूंवर कर लावला जातो. कच्चा माल तसेच मध्यस्थ वस्तूंवरील कर रद्द करण्यात आला. याद्वारे अबकारी करातून 'धबधबा परिणाम' (Cascading effect) काढून टाकण्याचा प्रयत्न केला गेला.
- २०००-०१ च्या अर्थसंकल्पात केंद्रीय अबकारी कर पध्दतीत मोठे फेरफार घडवून आणण्यात आले. MODVAT चे रुपांतर CENVAT (Central Value Added Tax) मध्ये करुन त्यात सुधारणा करण्यात आली. उत्पादन टप्प्यावर समान १६ टक्के मूलभूत CENVAT लागू करण्यात आला. तसेच काही ठराविक वस्तूंवर ८ टक्के, १६ टक्के व २४ टक्के विशेष अबकारी कर लावण्यात आले. २००१ – ०२ च्या अर्थसंकल्पात ह्या दरांऐवजी एकच १६ टक्के विशेष अबकारी कर लागू करण्यात आला. २००९ - १० मध्ये हा दर कमी करुन १० टक्के करण्यात आला होता.

## ➢ स्थानिक संस्था कर (Local Body Tax) :-

- महानगरपालिका क्षेत्रातील जकात कर बंदकरुन त्याऐवजी त्या क्षेत्रामध्ये होणाऱ्या प्रत्येक वस्तूच्या खरेदी विक्रीकर स्थानिक संस्थाकर (LBT) लागू केला जाणार आहे. १ एप्रिल २०१३ पासून महाराष्ट्रातील पुणे, चिंचवड, ठाणे, नवी मुंबई व नागपूर या पाच महानगर पालिका क्षेत्रामध्ये हा कर लागू केला गेला आहे.




- या अंतर्गत ज्या व्यापाऱ्याची वार्षिक खरेदी १ लाख रु. पेक्षा जास्त किंवा वार्षिक खरेदी – विक्री १.५ लाख रु. पेक्षा जास्त आहे. अशा प्रत्येक व्यापाऱ्याला नोंदणी करुन देणे आवश्यक आहे. या करपद्धतीमुळे स्थानिक पातळीवर कर चुकवेगिरी पद्धतीला आळा घालण्यास मदत होणार आहे.

## ❖ LBT कोणाला भरावा लागतो ?

➢ कोणताही व्यापारी (Dealer) जो महापालिका क्षेत्रात माल विक्रीसाठी, वापरासाठी किंवा उपभोगासाठी आणत असेल त्याला LBT भरावा लागतो.

## ❖ LBT चे दर कोणते ?

➢ LBT चे दर कायद्यातील अनुसूची 'अ' मध्ये दिले आहेत. हे दर शहरागणिक वेगवेगळे आहेत. काही ठिकाणी हे दर ०.१% ते ८% , तर काही ठिकाणी ४% सरासरी आहेत. अनुसूची 'ब' मध्ये अशा वस्तूंची यादी आहे. ज्यावर LBT आकारला जात नाही. जसे - खादी, तृणधान्ये इत्यादी

## ❖ LBT भरण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे काय ?

➢ होय. मालाची आयात करणारे सर्व व्यापारी

i) ज्यांना खरेदी-विक्रीचा एकूण वार्षिक व्यवहार (Turnover) १ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे.

ii) ज्यांनी ५००० रुपयांच्या मालाची खरेदी किंवा विक्री केली आहे त्यांना नोंदणी करणे आवश्यक आहे.

iii) शहरातल्या शहरात १.५ लाख रुपयांचा वार्षिक व्यवहार करणाऱ्यासाठी नोंदणी करावी लागते.

iv) Maharashtra VAT Act, २००२ अंतर्गत नोंदणी केलेल्या व VAT भरत असलेल्या सर्व व्यापाऱ्यांना LBT अंतर्गत नोंदणी करणे आवश्यक आहे.

## ❖ LBT कधीपर्यंत भरावा लागतो ?

➢ LBT दर महिन्याला भरावा लागतो. LBT भरण्याची शेवटची तारीख पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत असते. महापालिकेने निर्देशित केलेल्या बँकांमध्ये चलन भरुन LBT भरता येतो. दर महिन्यांनी म्हणजे वर्षातून २ वेळा व वर्षाच्या शेवटी LBT विवरण पत्र LBT Return भरावे लागते. व्यापाऱ्याला मागील ५ वर्षांचा सर्व हिशोब ठेवणे अत्यावश्यक असते. यात खरेदी विक्रीची कागदपत्रे, स्टॉक रजिस्टर, विविध व्हाऊचर्स सांभाळून ठेवावे लागतात.

## ❖ LBT न भरल्यास काय कारवाई होते ?

➢ नोंदणी न करता व्यवसाय चालू ठेवल्यास चुकविलेल्या कराच्या दहापट दंड

➢ LBT न भरल्यास कराच्या पाचपट दंड

➢ वेळेत LBT न भरल्यास दरमहा २% व्याजवसुली. वर्ष लोटून गेल्यास दरमहा ३% व्याजवसुली.

➢ खोटी बिले अथवा प्रमाणपत्रे सादर केल्यास कराच्या दुप्पट दंड

## ❖ LBT आणि Octroi (जकात) मध्ये फरक कोणता ?

➢ महापालिका हद्दीत येणाऱ्या मालावर जकात नाक्यावर Octroi (जकात) आकारली जाते व रोखीत गोळी केली जाते. LBT व्यापाऱ्याने स्वत: भरायचा आहे. स्वत:च स्वत:चे विवरणपत्र भरुन व्यापारी LBT पालिकेकडे जमा करेल, असे न केल्यास पालिका व्यापाऱ्यावर कारवाई करेल.

## ➢ प्रत्यक्ष करसंहिता (DTC – Direct Tax Code) :-

१. प्रत्यक्ष करांसाठी केंद्रीय आयकर कायदा १९६१ याऐवजी UPA शासनाने २०१० मध्ये प्रत्यक्ष करसंहिता – DTC संमत करण्यासाठी DTC विधेयक तयार केले. ३० ऑगस्ट २०१० रोजी DTC विधेयक संसदेत मंजुरीसाठी मांडण्यात आले. २०१२ मध्ये पुन्हा या विधेयकाची फेररचना करण्यात आली. परंतु राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाने UPA काळात सदर विधेयक संमत होऊ शकले नाही.

२. DTC विधेयकात खालील बाबींचा समावेश होता.

A] आयकर भरणाऱ्यांसाठी

i) पुरुष आणि स्त्रियांसाठी २ लाख रु. आयकरमुक्त मर्यादा

ii) ज्येष्ठ नागरिकांसाठी २.५ लाख रु. आयकरमुक्त मर्यादा

iii) १ लाख रुपयांपर्यंतच्या सरकारी गुंतवणुकीवर आयकर सवलत

iv) ०.५ लाख रुपयांपर्यंतच्या विम्यावर आयकर परतावा

v) १.५ लाख रुपयांपर्यंतच्या (गृहकर्जावरील) व्याजावर करसवलत

B] निगम कर भरणाऱ्यांसाठी

i) निगम कर - ३०%

ii) MAT (Minimum Alternate Tax) - २०%

iii) सेझ प्रकल्पांना विविध करसवलती

C] गुंतवणूकदारांसाठी

३. २०१५-१६ अर्थसंकल्पात हे विधेयक कालबाह्य झाल्याचे म्हटले गेले आहे.

## महाराष्ट्रातील व्यवसाय कर (Professional Tax)

- महाराष्ट्र शासनाने संपूर्ण राज्यात १९७२ मध्ये रोजगार हमी योजना सुरु केली. या योजनेसाठी निधीची व्यवस्था करण्यासाठी १९७५ मध्ये व्यवसाय कर लागू करण्यात आला. असा कर घटनेच्या २७६ व्या कलमांतर्गत लागू करण्यात आला, ज्याद्वारे राज्य सरकारांना व्यवसाय, व्यापार, रोजगार इत्यादींवर कर आकारण्याचा अधिकार देण्यात आला आहे.







### टोबेन कर (Tobin Tax)

परकीय चलनातील व्यवहारांवर लावला जाणारा कर म्हणजे टोबेन कर होय. जेम्स टोबेन या अर्थशास्त्रज्ञाने ही संकल्पना मांडली. अर्थव्यवस्थेतील परकीय चलनाच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवणे हा त्यामागचा हेतू होय.

## वस्तू व सेवाकर (GST – Goods & Service Tax)

- देशभरात आकारल्या जाणाऱ्या अप्रत्यक्ष करांचे जाळे गुंतागुंतीचे आहे. प्रायोगिक स्तरावर कॅनडामध्ये १९०५ मध्ये GST आकारला गेला. सर्वप्रथम GST आकारणारा देश फ्रान्स आहे. फ्रान्समध्ये २०% सरासरी दराने एप्रिल १९५४ पासून GST आकारला जाऊ लागला.

## ➢ GST TIMELINE

- ➢ Feb २००७ - केंद्रीय अर्थसंकल्पात GST ची घोषणा, अधिकार, समिती स्थापन
- ➢ May २००७ - संयुक्त कार्यकारी गट स्थापन
- ➢ Nov २००७ - संयुक्त कार्यकारी गटाचा अहवाल
- ➢ Nov २००९ - अधिकार समितीचा मसूदा
- ➢ Dec २००९ - १३ व्या वित्त आयोगाची शिफारस



- May २०११ - GST-११५ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर
- १९ Dec २०१४ - GST-१२२ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर
- ६ May २०१५- GST - १२२ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर
- १०१ घटनादुरुस्ती
- १ जुलै २०१७ : GST लागु

**१. नवीन कलम २४६A :-** GST हा विषय केंद्रसूचीतील काही आणि राज्यसूचीतील काही विषयांशी निगडीत असल्यामुळे GST विषयावर कायदे करण्याचा अधिकार कुणाचा? हे स्पष्ट करणारे २४६A कलम नव्याने टाकले जाईल.

**२. नवीन कलम २६९A :-** घटनेतील २६९ व्या कलमानुसार आंतरराज्यीय व्यापारातील वस्तू व सेवांवरील (विक्री आणि निर्गमन) करावर आकारणी व वसुली केंद्र सरकार करते व ज्या राज्यातून खरेदी झाली आहे त्याला वापरावयास देते. म्हणजे २६९ व्या कलमानुसार 'राज्यांना वापरासाठी दिलेला' हा केंदीय विक्री कर आहे या केंद्रीय विक्री कराचा समावेश आता GST त होईल. GST परिषद ठरवेल त्याप्रमाणे या कराचा वापर आता 'केंद्र व राज्य दोन्ही करणार' यासाठी २६९A हे नवीन कलम टाकले जाईल. या कराला अलीकडे IGST (Interstate GST) अशी परिभाषा वापरण्यात येतेय.

### ३. नवीन कलम २७९A :-

- घटनेत निव्वळ उत्पन्न (Net Proceeds) इत्यादींची गणना याबाबत २७९ वे कलम आहे. या कलमात केंद्र सरकारच्या निव्वळ कर उत्पन्नाची संक्षिप्त व्याख्या दिली आहे. पुढील २८० व्या कलमानुसार स्थापन झालेला वित्त आयोग या निव्वळ कर उत्पन्नाची विभागणी सुचवतो. घटनादुरुस्तीनंतर सर्व अप्रत्यक्ष करांचा समावेश असलेला GST कर आकारला जाईल. हा कर कसा, किती, कुणी आकारावा आणि या निव्वळ अप्रत्यक्ष कर उत्पन्नाची विभागणी कशी करावी हे GST परिषद सुचवेल. GST परिषदेची रचना आणि कार्य सुचविणारे २७९A कलम घटनेत नव्याने टाकले जाईल. म्हणजे घटनादुरुस्तीनंतर निव्वळ कर उत्पन्नाची वाटणी करणाऱ्या दोन संस्था राहतील, २७९A कलमान्वये GST परिषद आणि २८० कलमान्वये वित्तआयोग.

### ४. कलम २६८ दुरुस्ती आणि कलम २६८A बाद :-

- केंद्र-राज्य संबंध पाहताना आपण ही कलमे बघितली. २६८ कलम म्हणजे केंद्र आकारत असलेले, राज्य वसूल व वापर करत असलेले कर या कलमानुसार औषधी व सौंदर्यप्रसाधनांवरील उत्पादनशुल्क केंद्र आकारत असते, पण वसूल आणि वापर राज्य करत असते. आता हा कर GST मध्ये जात असल्यामुळे त्याची आकारणी, वसुली आणि वापर केंद्र आणि राज्य दोन्ही करतील. यामुळे २६८ कलमात दुरुस्ती केली जाईल आणि 'औषधी व सौंदर्यप्रसाधनांवरील उत्पादनशुल्क' हे वाक्य वगळण्यात येईल.
- २६८A हे कलम सेवाकराचे असून हे कलम २००३ मधील ८८ व्या घटनादुरुस्तीने टाकण्यात आले. सेवाकर हा केंद्र आकारात असलेला, केंद्र व राज्य वसूल आणि वापर करत असलेला कर आहे. सेवाकर हाही GST त जाणार असल्यामुळे ८८ व्या घटनादुरुस्तीने टाकलेले हे कलम १२२ व्या घटनादुरुस्तीने बाद केले जाईल. तसेच केंद्रसूचीतील ९२C हा (सेवाकर) विषयही बाद केला जाईल.

### ५. कलम २७१ दुरुस्ती :-

- २७१ व्या कलमानुसार केंद्राला अधिभार (Surcharge) आकारण्याचा अधिकार देण्यात आला आहे. GST हा विषय केंद्र आणि राज्य दोन्हींचा असल्यामुळे घटनादुरुस्तीनंतर GST वर अधिभार आकारण्याचा GST परिषदेला राहील, एकटया केंद्राला नव्हे, त्यामुळे २७१ व्या कलमात 'केंद्राला GST वगळून इतर करांवर अधिभार आकारण्याचा अधिकार आहे' अशी दुरुस्ती करण्यात येईल.

**६. किरकोळ दुरुस्त्या :-** कलम २४८, २४९, २५०, २६९, २७०, २८६, ३६६ आणि ३६८ या कलमांमध्ये किरकोळ शाब्दिक दुरुस्त्या करण्यात येतील.

### ७. सातवे परिशिष्ट - केंद्रसूची :-

- केंद्रसूचीतील विषय क्रमांक ८४ 'केंद्रीय उत्पादन शुल्क' हा विषय आहे. घटनात्मक दुरुस्तीनुसार ८४ वा विषय खालीलप्रमाणे राहील.
- 'विषय क्रमांक ८४ – भारतात उत्पादित केलेल्या खालील वस्तूंवरील उत्पादनशुल्क'
  a) कच्चे तेल b) डिझेल c) पेट्रोल d) नैसर्गिक वायू
  e) वायूवाहतुकीचे इंधन f) तंबाखू व तंबाखू उत्पादने
- विषय क्रमांक ९२ (वर्तमानपत्रांची खरेदी व विक्री व त्यातील जाहिरातींच्या प्रकाशनावरील कर) तसेच ९२C (सेवाकर) हे विषय बाद केले जातील. १२२ व्या घटनादुरुस्तीमुळे केंद्रसूचीतील करांच्या विषयांची संख्या १४ वरुन १२ वर येईल.

## ८) सातवे परिशिष्ट - राज्यसूची :-

i. राज्यसूचीतील विषय क्रमांक ५४ – वस्तू खरेदी व विक्रीवरील कर हा विषय आहे. घटनादुरुस्तीनुसार ५४ वा विषय खालीलप्रमाणे राहील.
   - ‘विषय क्रमांक – ५४ कच्चे तेल, डिझेल, पेट्रोल, नैसर्गिक वायू, वायू वाहतुकीचे इंधन, दारु यांच्या (आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय विक्री वगळता) विक्रीवरील कर’

ii. करमणूक, मनोरंजन व सट्टेबाजावरील कर या ६२ व्या विषयात थोडी सुधारणा करुन हा विषय खालीलप्रमाणे राहील :-
   - ‘विषय क्रमांक ६२ - करमणूक व मनोरंजनावरील कर जो पंचायत, नगरपालिका किंवा जिल्हा परिषदांकडून आकारला व वसूल केला जाऊ शकतो.’

iii. विषय क्रमांक – ५२ (वस्तू आगमनावरील कर) आणि विषय क्रमांक ५५ (जाहिरातींवरील कर) हे विषय बाद होतील.

iv. १२२ व्या घटनादुरुस्तीमुळे राज्यसूचीतील करांच्या विषयांची संख्या १९ वरुन १७ वर येईल.

v. कच्चे तेल, डिझेल, पेट्रोल, नैसर्गिक वायू, वायू वाहतुकीवरील इंधन या वस्तूंवर केंद्र व राज्य वेगवेगळे कर आकारत असत. आता हे विषय दोन्ही सूचीत सामाईक असून त्यांची कर आकारणी व नियम GST परिषद निश्चित करेल.

## ९) इतर :-

i. GST लागू झाल्यानंतर दोन वर्षांपर्यंत केंद्र आंतरराज्यीय वस्तू व्यापारावर किमान १% जास्तीचा कर आकारेल आणि वसूल करेल आणि ज्या राज्यातून पुरवठा झाला आहे त्या राज्याला देईल. (राज्यसभेच्या प्रवर समितीने सुचवल्याप्रमाणे सुधारीत विधेयकात ही सुधारणा बाद करण्यात आली आहे.)

ii. संसद, कायदा करुन, GST परिषदेच्या शिफारशीनुसार GST ची अंमलबजावणी केल्यामुळे राज्यांना महसुली नुकसान झाल्यास पहिली किमान ५ वर्षे राज्यांना नुकसानभरपाई देण्याचे प्रयोजन करेल. (राज्यसभेच्या प्रवर समितीने सुचवल्याप्रमाणे किमान ५ वर्षे राज्यांना ‘१००%’ नुकसानभरपाई देण्याची सुधारणा या विधेयकात करण्यात आली आहे.)

iii. १२ AUG २०१६ : आसाम पहिले राज्य ज्याने GST विधेयकाला मंजुरी दिली (२) बिहार (३) झारखंड आहे.

iv. २९ AUG २०१६ : महाराष्ट्र : (१० वे राज्य ) (१५ वे गोवा )

v. १० SEP : GST Council स्थापन (अध्यक्ष अर्थमंत्री उपाध्यक्ष सुनिल मोदी)(आता पर्यत २८ परिषदा )

vi. GSTN -GST COMPUTER NETWORK -२०१३ -GST ला तांत्रिक मदत करणे भागीदारी केंद्र ५१ % खाजगी -४९%

## ❖ GST करात खालील अप्रत्यक्ष करांचा समावेश झाला:-

### A) केंद्राचे अप्रत्यक्ष कर :-

i. केंद्रीय उत्पादन शुल्क
ii. अतिरिक्त उत्पादन शुल्क
iii. औषधी व सौंदर्यप्रसाधनांवरील उत्पादन शुल्क
iv. सेवाकर
v. अतिरिक्त सीमाकर
vi. आयातीवरील विशिष्ट वाढीव शुल्क
vii. वस्तू आणि सेवांच्या पुरवठयाशी संबंधित राज्य अधिभार व उपकर
viii. केंद्रीय विक्री कर




## GST कर आकारणीमुळे खालील फायदे :-

i. भारतीय उद्योगात व व्यापारात देशी तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मकता लाभेल.
ii. अप्रत्यक्ष कर सरल होतील.
iii. दराचे कमीत कमी स्तर राहतील.
iv. करवसुलीचा खर्च कमी होईल.
v. GST VAT पध्दतीने आकारल्यामुळे सर्वच अप्रत्यक्ष करांमधील धबधबा परिणाम टाळता येतील.
vi. कालांतराने प्रचंड करसंकलन होऊ लागेल.

**Impact of GST on household expenses**

| | Food | Entertainment | Transportation | Household Personal Care | Mobile Phone Services |
|---|---|---|---|---|---|
| Before | 12.5% | 30% | 15% | 28% | 15% |
| After | 5% | 28% | 18% | 18% | 18% |

## ❖ GST वरुन केंद्र व राज्यातील वाद :-

i. राज्यांना नुकसानभरपाईचे आश्वासन देऊनही नुकसान किती होऊ शकते आणि किती वाढ होऊ शकते याचा अंदाज बांधणे अवघड आहे.
ii. राज्यांना स्वत:ची राजकोषीय स्वयंपूर्णता जाण्याची भीती आहे.
iii. विविध राज्ये विविध क्षेत्रांमध्ये प्रगत आहेत. अशावेळी एखादे राज्य विशिष्ट उत्पादनातून जास्त कर महसूल देऊ शकते. परंतु त्याची वाटणी सर्वच राज्यांमध्ये होईल. राज्यांना अशा विशिष्ट उत्पादनांवर विशेष कर लावण्याची परवानगी देण्यास केंद्राचा तात्त्विक विरोध आहे. कारण यामुळे एकल करप्रणालीस बाधा निर्माण होईल.
iv. पेट्रोलियम पदार्थांवर राज्यांना काही काळापर्यंत कर आकारण्याची परवानगी दिली जाणार असली, तरी कधीतरी पेट्रोलियम पदार्थ GST कराच्या जाळ्यात येतीलच.

- ६ मे २०१५ ला लोकसभेने संमत केल्यानंतर सदर विधेयक राज्यसभेत चर्चेला आले. राज्यसभेने श्री. भूपेर यादव यांच्या अध्यक्षतेखालील प्रवर समितीकडे (Select Committee) १४ मे २०१५ ला हे विधेयक चर्चेसाठी पाठवले. प्रवर समितीने सुचवलेल्या सुधारणा (आणि सुब्रमण्यम समितीने सुचवेल्या सुधारणा) पैकी '१% अतिरिक्त कर आकारणी बाद करणे' आणि 'राज्यांचे ५ वर्षापर्यंत १००% महसूली नुकसान भरुन काढणे' या दोन मुख्य शिफारशी केंद्राने स्विकारल्या. २७ जुलै २०१६ ला केंद्रीय मंत्रिमंडळाने या सुधारणांना मंजुरी देवून तसे बदलही विधेयकात करण्यात आले.

- ३ ऑगस्ट २०१६ ला राज्यसभेने सुधारीत विधेयक संमत केले आहे. काँग्रेसच्या ६०, बीजेपीच्या ५३ सह २०३ राज्यसभा सदस्यांनी GST च्या बाजूने मत दिले. AIADMK च्या १३ सदस्यांनी राज्यसभेतही मतदानात भाग घेतला नाही. राज्यसभेत संमत झाल्यामुळे GST लागू करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

## ❖ १२२ वे घटनादुरुस्ती विधेयक :-




- नवीन कलमे - २४६A, २६९A, २७९A
- दुरुस्त्या – २६८, २७१
- किरकोळ दुरुस्त्या – २४८, २४९, २५०, २६९, २७०, २८६, ३६६, ३६८
- बाद – २६८A

सातवे परिशिष्ट
↓
केंद्रसूची → दुरुस्त विषय ८४ → बाद विषय ९२, ९२C

राज्यसूची → दुरुस्त विषय ५४, ६२ → बाद विषय ५२, ५५

# वित्त आयोग ( Finance Commission)




केंद्राच्या कर उत्पन्नाचा मोठा वाटा राज्यांना वाटून दिला जातो. हे वाटप ठरविण्यासाठी व त्याबद्दलच्या तरतूदी निश्चित करण्यासाठी राष्ट्रपती वित्त आयोग नेमतात. कलम २८० नुसार दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना होते. वित्त आयोगामध्ये एकूण पाच सदस्य असून आयोगाचा कार्यकाल ५ वर्षे असतो.

## उदिष्टे

१. केंद्राचा बिगरशेती उत्पन्न कर, उत्पादन शुक्ल, अतिरिक्त उत्पादन शुक्ल यांच्या केंद्र व राज्यामधील वाटपाची तत्वे ठरविणे.
२. सहाय्यक अनुदानासबंधी तसेच खास अनुदानासबंधी शिफारशी करणे.
३. राज्यांना आर्थिक अनुदान देतांना विचारात घेतली जाणारी मार्गदर्शक तत्वे ठरविणे.
४. केंद्र व राज्य सरकार यांच्यातील करात बदल करण्याचे अधिकार वित्त आयोगाला आहेत.
५. राष्ट्रपतींना टाकलेली इतर आर्थिक जबाबदारी पार पाडणे.

## ➢ बारावा वित्त आयोग (२००५ – १०) :-



- अध्यक्ष : डॉ. सी. रंगराजन
- स्थापना : २००३
- अहवाल सादर करण्याची तारीख : ३० नोव्हेंबर २००४
- कार्यकाळ : २००५-१०

### ❖ शिफारशी :-

१. केंद्र व राज्यांनी एकत्रितपणे वर्ष २००९ – १० पर्यंत करांचा वाटा GDP च्या १७.६ टक्के पर्यंत वाढवावा.
२. वित्तीय तूट GDP च्या ३ टक्के पर्यंतच ठेवावी.
३. २००८ – ०९ पर्यंत केंद्र व राज्य यांनी महसुली तूट शून्यापर्यंत खाली आणावी.
४. २००५ ते २०१०च्या कालवधीत केंद्रीय कर व शुल्कांमध्ये राज्यांची भागीदारी २९.५ टक्क्यांवरुन ३०.५ टक्क्यापर्यंत केली.
५. केंद्राने महसूलातील जास्तीत जास्त ३८ टक्के रक्कम राज्यांना देण्याचे निश्चित करावे.
६. पंचायत राज संस्थाना अनुदान म्हणून २० हजार कोटी व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना ५ हजार कोटी अनुदान देण्यात यावे.
७. नैसर्गिक आपत्ती पुनर्वसन निधी योजना सध्याच्या स्वरुपात पुढे चालू ठेवण्यात यावी. त्यात केंद्र राज्य यांचा वाटा ७५ : २५ या प्रमाणात असेल.
८. या आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय उत्पन्नातील सर्वाधिक वाटा उत्तरप्रदेशला (१९.२६ टक्के) तर सर्वात कमी वाटा सिक्कीमला (०.२३ टक्के) मिळाला आहे. महाराष्ट्राचा वाटा ४.९९ टक्के इतका आहे.

## ➢ तेरावा वित्त आयोग (२०१० – १५ ) :-



- अध्यक्ष : श्री. विजय एल. केळकर
- स्थापना : १३/११/२००७
- अहवाल सादर करण्याची तारीख – ३० डिसेंबर २००९
- कार्यकाळ – २०१०-२०१५
- सदस्य – श्री. बी. के. चतुर्वेदी, डॉ. इंदिरा राजरामन, श्री. अतुल शर्मा, डॉ. संजीव मिश्रा (सचिव – श्री. सुमित बोस)

### ❖ शिफारशी :-

१. २०१० ते २०१५ या कालवधीत केंद्रीय कर व शुल्कांमध्ये राज्यांची भागीदारी ३०.५ टक्क्यांवरुन ३२ टक्क्यांपर्यंत केली.
२. केंद्र आणि राज्य सरकारांनी एकत्रितपणे सार्वजनिक कर्जाचे प्रमाण २०१४ – १५ पर्यंत ६८ टक्क्यापर्यंत कमी करावे. नंतर ते प्रमाण २०१५ – १६ पर्यंत ६५ टक्क्यांपर्यंत कमी करावे.

३. आर्थिक स्थिरता आणण्यासाठी वित्तीय वातावरण निर्मितीबाबतच्या शिफारशी केल्या. यानुसार राज्यांच्या एकत्रित वित्तीय तूटीचे प्रमाण २.४ टक्क्यांपर्यंत कमी करावे.
४. या काळात महाराष्ट्राला स्थानिक स्वराज्य संस्थांचे अनुदान म्हणून ३१७७ कोटी रु. मिळाले.
५. उपलब्ध निधी आणि नैसर्गिक आपत्ती निवारणासाठीच्या निधी वाटपाबाबत आवश्यक ते धोरण ठरविणे.
६. या आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय उत्पन्नातील महाराष्ट्राचा वाटा ५.१९ टक्के इतका आहे. सर्वात जास्त वाटा उत्तरप्रदेश (१९६७) व सर्वात कमी वाटा सिक्कीमचा (०.२४ टक्के) आहे.

## ➢ चौदावा वित्त आयोग (२०१५ – २०२०) :-

- कलम २८० नुसार राष्ट्रपतीनी २ जानेवारी २०१३ रोजी १४ व्या वित्त आयोगाचे गठन केले असून त्याचे अध्यक्ष आरबीआयचे माजी गव्हर्नर वाय. व्ही. रेड्डी हे आहेत. चौदाव्या आयोगाच्या शिफारशी २०१५ ते २०२० या कालावधीसाठी लागू राहतील. या आयोगाला ३१ ऑक्टोबर, २०१४ पर्यत आपला अहवाल सरकारला सादर करावयाचा आहे. १४ व्या आयोगामध्ये प्रो. अभिजीत सेन, श्रीमती. सुषमा नाथ व डॉ. एम. गोविंद राव हे इतर सदस्य आहेत. अजय नारायण झा हे याचे सचीव आहेत. केंद्र सरकारने फेब्रुवारी २०१५ मध्ये १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या. या आयोगाचे डॉ. वाय. व्ही. रेड्डी आहेत. १४ व्या वित्त आयोग अहवाल सादर करण्याची तारीख ३१ ऑक्टोबर २०१४ होती. परंतु ती वाढवून ३१ डिसेंबर २०१४ करण्यात आली.




- स्थापना : २ जून २०१३
- कालावधी : १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०२०
- अध्यक्ष : डॉ. वाय. व्ही. रेड्डी (माजी RBI गव्हर्नर)
- सचिव : अजय नारायण झा
- सदस्य : अभिजित सेन अर्धवेळ सदस्य (नियोजन आयोग माजी सदस्य)
- सुषमा नाथ (माजी केंद्रिय वित्त सचिव)
- डॉ. गोविंद राव (राष्ट्रीय सार्वजनिक वित्त आणि धोरणसंस्था, नवी दिल्लीचे संचालक)
- डॉ. सुदिप्तो मुंडले (राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाचे अध्यक्ष)
- चौदाव्या वित्त आयोगानुसार सर्वाधिक उत्तर प्रदेशला १७.९५९% , महाराष्ट्राला (५.५२१) निधी मिळाला.
- चौदाव्या वित्त आयोगानुसार सर्वात कमी निधी सिक्कीमला ०.३६७% मिळाला.
- आत्तापर्यंत महाराष्ट्रातील तीन व्यक्तींनी वित्तआयोगाचे अध्यक्षस्थान भूषविले.
  १. यशवंतराव चव्हाण - आठवा वित्त आयोग
  २. एन. के. पी. साळवे - नववा वित्त आयोग
  ३. विजय केळकर – तेरावा वित्त आयोग
- पहिल्या वित्त आयोगाचे अध्यक्ष - के. सी. निओगी
- केंद्र व राज्य सरकारमध्ये वाटप केल्या जाणाऱ्या करातील राज्याचा हिस्सा ३२% असणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात सध्या ४ था वित्त आयोग कार्यरत आहे. महाराष्ट्रात पहिला वित्त आयोग १९९४ ला मकरंद हेरवाडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला. दुसरा वित्त आयोग १९९९ ला एस. हबीबुल्लाह यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला. तिसरा वित्त आयोग २००५ ला सतीश त्रिपाठी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला. सध्याचा चौथा वित्त आयोग २०१० मध्ये जे.पी. डांगे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला.

### आत्तापर्यंतचे वित्त आयोग

| आयोग | स्थापना | अध्यक्ष | कार्यकाल | अहवाल सादर |
|---|---|---|---|---|
| पहिला | १९५१ | के. सी. नियोगी | १९५२-५७ | १९५२ |
| दुसरा | १९५६ | के. संथानम | १९५७-६२ | १९५७ |
| तिसरा | १९६० | ए. के. चंदा | १९६२-६६ | १९६१ |
| चौथा | १९६४ | डॉ. ए. पी. व्ही. राजमन्नार | १९६६-६९ | १९६५ |
| पाचवा | १९६८ | महावीर त्यागी | १९६९-७४ | १९६९ |
| सहावा | १९७२ | ब्रम्हानंद रेड्डी | १९७४-७९ | १९७३ |
| सातवा | १९७७ | जे. एम. शेलेट | १९७९-८४ | १९७८ |
| आठवा | १९८३ | यशवंतराव चव्हाण | १९८४-८९ | १९८४ |
| नववा | १९८७ | एन. के. पी. साळवे | १९८९-९५ | १९८९ |
| दहावा | १९९२ | के. सी. पंत | १९९५-२००० | १९९४ |
| अकरावा | १९९८ | ए. एम. खुस्त्रो | २०००-२००५ | २००० |
| बारावा | २००२ | सी. रंगराजन | २००५-२०१० | ३० नोव्हें. २००४ |
| तेरावा | २००७ | विजय केळकर | २०१०-२०१५ | ३० डिसें. २००९ |
| चौदावा | २०१३ | वाय. व्ही. रेड्डी | २०१५-२०२० | १५ डिसें. २०१४ |
| पंधरावा | | एन. कें. सिंग | २०२० - २०२५ | |

## ➢ पंधरावा वित्त आयोग (२०२०-२०२५) :-

- स्थापना : २०१७
- काळावधी : २०२० ते २०२५
- अध्यक्ष : एन.के. सिंग
- SEO : अरविंद मेहता
- सदस्य : १) अशोक लहरी २) रमेश चंद ३) अनुप सिंग ४) अजय नारायण झा.
- हे वित आयोग सहा वर्षासाठी आपल्या शिफारस सादर करणार आहे.

### महत्त्वाचे मुद्दे

- राज्यांना २०१४-१५ मध्ये ३.४८ लाख कोटी तर २०१५-१६ मध्ये ५.२६ लाख कोटी रुपये मिळणार आहेत.
- केंद्राकडून राज्याकडे ४२% कराच्या पावत्यांचे हस्तांतरण वाढविण्यासाठी सरकारने १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी मान्य केल्या.
- केंद्राच्या निव्वळ कर पावत्यामध्ये राज्यांचा हिस्सा २०१५-१६ मध्ये १७८००० कोटी इतक्या रुपयांनी वाढणार आहे.
- हस्तांतरणाच्या टक्केवारीतील हा सर्वात मोठा बदल आहे.
- वाढीव कर हस्तांतरणामुळे राज्यांना त्यांच्या धोरणामध्ये गरज आणि आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यासाठी स्वायतत्ता मिळणार आहे.
- महसूलाची अडचण असणाऱ्या ११ राज्यांना ४८,९०६ कोटी रु. अर्थसहाय्य देण्याची शिफारस (यामध्ये आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, जम्मू-काश्मिर यांचा समावेश आहे.)
- २०१५-१६ मध्ये सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत वित्तीय तुटीचे लक्ष्य ३.६% राखण्याचा सल्ला केंद्राला दिला आहे.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★